सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय परळी वै.
( दंड विभाग )
दुरध्वनी/फॅक्स:-02446-226330 Email-Id:-sdoparli@gmail.com

संदर्भ:-मा.जिल्हाधिकारी बीड यांचे परिपत्रक क्र.2025/आरबी-डेस्क-1/पोल-1/पोलीस पाटील/कावी दि.15.01.2026

क्र.2026/उविअ/पोलीस पाटील भरती/जाहिरात क्र.01/2026/कावी दि.16.01.2026

# परळी उपविभागातील रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेबाबत जाहीरनामा

**बीड जिल्हयातील परळी वै. उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील ( तालुका- परळी वै.) गावात पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक अमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने https://beed.gov.in व https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहे.**

**अ)**

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | 19.01.2026 वेळ-00.00 |
| 2 | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | 30.01.2026 वेळ 23.59 वा.पर्यंत |
| 3 | उमेदवाराचे अर्जाची छाननी **व** पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र निर्गमीत करणे (संबंधीत उमेदवारांनी संकेतस्थळावरून प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावेत) | 02.02.2026 ते 06.02.2026 |
| 4 | लेखी परिक्षेचा दिनांक | 22.02.2026 |
| 5 | प्रथम उत्तरतालीका(Answer Key) प्रसिध्द करणे | 22.02.2026 सायंकाळी |
| 6 | लेखी परिक्षेचा निकाल घोषीत करणे | 24.02.2026 |
| 7 | मुलाखतीस पात्र उमेदवाराची यादी प्रसिध्द करणे | 24.02.2026 |
| 8 | मुलाखतीचा दिनांक | 25.02.2026 ते 28.02.2026 |
| 9 | अंतिम निकाल जाहीर करणे | 02.03.2026 |

**टिप-वरील कोणत्याही दिनांकामध्ये बदल करण्याचे अधिकार राखुन ठेवले आहेत.त्याबाबत झालेल्या बदलाबाबत संकेतस्थळावर माहिती देण्यात येईल.**

**परिक्षा शुल्क खाली प्रमाणे विहीत पध्दतीने भरावे लागेल.**

| | | |
|---|---|---|
| **खुला प्रवर्ग -** | **रुपये** 1000/- | Online **payment पद्धतीने** संकेतस्थळावर अर्ज भरताना त्याच वेळी भरणा करणे बंधनकारक राहील. |
| **आरक्षीत/आर्थीकदुर्बल घटक प्रवर्गासाठी -** | **रुपये** 800/- | |

**(वर दर्शविण्यात आलेले प्रक्रिया शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)**

UPI-Phonepay, GPay, **नेटबँकिंग / डेबिट कार्ड / क्रेडीट कार्डव्दारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.**

**ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी** (Payment Transaction Successful) **झाल्याची संपूर्ण खात्री करुन घ्यावी, प्रक्रिया शुल्क भरण्या करीता नेटबँकिंग / डेबिटकार्ड / क्रेडीट कार्ड वापरून होणा-याव्यवहारांची संपुर्णतःजबाबदारी उमेदवाराची आहे व उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, परळी वै. यास जबाबदार असणार नाही.**

सरळ सेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात https://beed.gov.in व https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. पोलीस पाटील पदाचे परीक्षेचे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त स्थळावरच ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहीत परिक्षा शुल्क असलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत : बदल करणे पदाच्या एकूण संख्येत व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी परळी वै. यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. परळी वै. उपविभागातील पोलीस पाटलांची सदयस्थितीमधील रिक्त पदे भरणे आवश्यक आहे. त्याबाबतची रिक्त पदाची माहिती सोबत जोडलेले परिशीष्ट -अ मध्ये दशर्ववलेली आहे.

ब) पोलीस पाटील पदासाठी किमान आवश्यक अर्हता -

1) अर्जदार हा दहावी (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा.
2) (अ) वयोमर्यादे करीता अर्जदारचे दिनांक 30 जानेवारी,2026 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.
   (ब) अर्जदाराचे वय दिनांक 30 जानेवारी,2026 रोजी 25 पेक्षा कमी नसावे व 45 पेक्षा जास्त नसावे.
   (क) पोलीस पाटील पदाकरीता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.
3) अर्जदार हा स्थानिक व कायम रहिवासी असावा. (अर्जदाराने ग्रामपंचायत/तहसिलदार यांचे रहिवासी प्रमाणपत्र, रेशन कार्ड, निवडणूक कार्ड, ओळखपत्र, आधारकार्ड किंवा ज्या पुराव्याने स्थानिक व कायम रहिवासी असल्याचे सिध्द होते, अशा कोणत्याही एका पुराव्याची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील व मुलाखातीचे वेळी अर्जासोबत जोडलेले मूळ पुरावा कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.)
4) अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चा ई-मेल व मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे.
5) अर्जदार शाररिकदृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असणे आवश्यक आहे.
6) महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटूंबाची अर्हता धारण करणे आवश्यक (अर्जदार याची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)
7) अनु. जाती व अनु. जमाती प्रवर्गाच्या व ईतर आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.
8) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज ब, क, ड ,एसईबीसी या प्रवर्गातील अर्जदार यांना सन 2025-26 या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत गटात (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
9) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा अ व भज- ब, क, ड ,एसईबीसी या प्रवर्गातील महिला पदांसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदार यांना सन 2025-26 या कालावधीकरीता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
10) आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक EWS करीता आरक्षीत जागेसाठी वर्ष 2025-26 चे तहसिलदार यांनी निर्गमीत केलेले आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटक EWS प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
11) सर्व आवश्यक कागदपत्र व पात्रता निकषासाठी अर्हता दिनांक ही 30.01.2026 ही राहील.

क)परीक्षेचे स्वरुप-

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परीक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | तोंडी परीक्षा गुण | एकूण गुण |
| 1 | पोलीस पाटील | 80 | 20 | 100 |

**लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालील प्रमाणे राहील:-**

1) पोलीस पाटील पदाची लेखी परीक्षा 80 गुणांची असेल प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील.
2) लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
3) लेखी परीक्षा इयत्ता दहावी (एस. एस. सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल यात सामान्य ज्ञान, गणित, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमत्ता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती चालू घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.
4) लेखी परीक्षेत एकूण 80 गुणांपैकी किमान36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारा मधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराची तोंडी परीक्षा घेण्यात येईल.
5) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2010/2009/प्र. क्र.66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तर पत्रिकेवर उत्तर लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेन वापर करावा लागेल.
6) लेखी परीक्षेत मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारास पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परीक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील तोंडी परीक्षेत अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल.

**ड) निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती :-**

1) प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस पात्रता व इतर संबंधीत मूळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी अन्यथा तोंडी परीक्षा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.
2) लेखी परिक्षा, तोंडी परीक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता तसेच प्रवेशपत्र, भरती कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील, पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
3) **लेखी परीक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. तसेच अशा अर्जदाराचे परिक्षा शुल्क इत्यादी सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.**
4) अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिकार्यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.
5) अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारीत्र्य प्रमाणपत्र हे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
6) अर्जदारांचे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा.त्याचप्रमाणे तो इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी करणारा व ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा, अथवा पूर्णवेळ नोकरी करणारा नसावा याबाबतचे रुपये 500/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र हे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
7) पोलीस पाटील पदांवरील नियुक्तीकरीता मृत / सेवानिवृत्त पोलीस पाटलांच्या वारसांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यात प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्रामपोलीस पाटील (सेवा प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार त्या गावांसाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक/समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.
8) अर्जदार संबंधीत गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
9) अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असू शकतो. सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.

10) प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषानुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षणव्यतिरीक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये.)

11) संपूर्ण परळी वै. उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व गावांसाठी एकाच दिवशी व वेळी परिक्षा घेण्यात येईल.

12) संपूर्ण भरती प्रक्रिया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

13) पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.

14) पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पदधारण करणारी व्यक्ती ही शारिरिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनाअपंगासाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

15) पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते, त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांनाप्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागू होत नाहीत.

16) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती,जमाती यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) हा दिनांक 29 जानेवारी 2004 पासुन अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.अ. भ.ज.ब. भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व., सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील अर्जदारांकडे भरती करीता सन 2025-26 वर्षाचे वैध असलेले सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

17) महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णक क्र. महिआ 2023/प्र.क्र.223/कार्या-2 दि.04 मे 2023 अन्वये खुल्या गटातील महिलां करिता आरक्षीत असलेल्या पदावरती निवडी करिता नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच,अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागासप्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागासप्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजनकल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासना कडून वेळो वेळी विहित करण्यात आल्या प्रमाणे नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

18) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारांना विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

19) लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणा-या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परीक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा अर्जदार पोलीस पाटील पदांवरील निवडीकरीता पात्र राहील.

20) समान गुण मिळाल्यास शासन निर्णय क्र. डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र.592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

1) पोलीस पाटलांचे वारस, (पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश त्याव्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही) त्यानंतर

2) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारणकरणारे अर्जदार, त्यानंतर

3) माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर

4) वयाने जेष्ठ असलेले अर्जदार,

21) याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय वपरिपत्रके तसेच नेमणुकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

22) हा जाहिरनामा / जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत, असे समजण्यातयेईल.

23) परीक्षा शुल्क न भरणा करण्यात आलेले अर्ज अपात्र करण्यात येतील.

**इ)ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत**

1) प्रस्तुत पदांकरीता फक्त **https://beedpp.recruitonline.in** या अधिकृत संकेतस्थळावरून विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील.

2) इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, परळी वै. हे जबाबदार असणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

3) पात्र उमेदवाराला वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज **https://beedpp.recruitonline.in** या वेबसाईटद्वारे दि. 19.01.2026 ते दि. 30 .01.2026 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.अंतीम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

4) अर्जदार यांनी सदर संकेतस्थळावर प्रथम लॉगीन आयडी व पासवर्ड तयार करुन जतन करुन ठेवावा.अर्जदार यांनी अर्ज भरताना गावाचे नाव,आरक्षण व जाहीरातीमध्यील अटी व शर्ती याची खात्री करुन अर्ज भरावा.अर्ज नाकारल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत अर्जदार यांची राहील.

5) अर्जदार यांनी सदर संकेतस्थळावर विस्तृत माहितीसाठी "प्रथम अर्ज कसा भरावा" हा टॅब ओपन करुन पहावा.

6) **https://beedpp.recruitonline.in** या संकेतस्थळावर "अर्ज करा" या link वर clik करावे.यानंतर संबधीत पदासाठीचा अर्ज दिसुन येईल.

7) उमेदवाराने त्याचा मागील सहा महिन्याची कालावधीमधील Photo व सही संकेतस्थवर दिलेल्या माहितीनूसार upload करावा.

8) उमेदवाराने सर्व माहिती भरल्यानंतर continue वर click करावे यामुळे भरलेल्या अर्जाचे पुनर्वलोकन (Review) करता येईल.तसेच अर्जातील माहिती बदलायची असल्यास edit form वर click करुन करता येईल.

9) अर्जातील सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करुन save and continue करावे.त्यांनंतर अर्ज save होऊन Form Id तयार होईल.तयार झालेला Form Id संपुर्ण भरती प्रक्रीयेत उपयुक्त असल्याने सांभाळुन ठेवावा.

10) यानंतर उमेदवाराने परिक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने UPI-Phonepay, GPay ईत्यादवारे QR Code स्कॅन करुन **ऑनलाईन पद्धतीने** भरणे अवश्यक राहील.

11) ऑनलाईल परीक्षा शुल्क भरल्यानंतर अर्जाची print काढता येईल.

12) उमेदवाराने संकेतस्थळावर नोंदणी करताना दिलेल्या मोबाईल नंबरवर भरती प्रक्रीया संदर्भात आवश्यक त्या सुचना एसएमएसव्दारे दिल्या जातील.

13) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, अर्जदार यांचेकडे असलेली उच्च शैक्षणिक गुणवत्ता व ईतर शैक्षणीक अर्हता कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासून ऑनलाईन अर्ज भरावा.

14) अर्जदारांनी प्रवेशपत्र दि.02/02/2026 रोजीपासून Download करुन घ्यावेत.व परिक्षा दिवशी सदरील प्रवेशपत्राची कलर प्रत सादर करणे बंधनकारक राहील.प्रवेशपत्राशिवाय परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही.तसेच सोबत आधारकार्डची प्रत आणने देखील बंधनकारक राहील.तसेच महिलांचे लग्नानंतर नावात बदल झाला असल्यास **नमुना-फ** मधील स्वयंघाषनापत्र सादर करणे आवश्यक राहील.**(नमुना-फ नमुना जाहीरातीसोबत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे)**

15) कोणत्याही उमेदवारास पोस्टादवारे प्रवेशपत्र पाठवले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

16) लेखी परिक्षा झाल्यावर त्याच दिवशी प्रथम उत्तरतालीका संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल व लेखी परिक्षेच्या दुसऱ्या दिवशी सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत लेखी पुराव्यानिशी आक्षेप समक्ष उपस्थीत राहुन उपविभागीय अधिकारी कार्यालय, परळी वै. येथे दाखल करावा.

17) उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतेही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखापरिक्षेच्या प्राथमिक चाळणी/तोंडीपरीक्षेनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार उपविभागीय दंडाधिकारी परळी वै. यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

18) ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नोंदविलेली आहेत, अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षाशुल्क भरणे आवश्यक राहील. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, अशा उमेदवाराना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

19) माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणेआवश्यक आहे. सदरप्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करावे लागतील.

20) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचाअथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हताधारण न करणारा आढळल्यास खोटी माहिती पुरविल्यास किंवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतूनबाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्तकरण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

21) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/ नियुक्ती रद्द करण्यात येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

22) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

23) परीक्षेस पडताळणीस मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे.

24) अर्जदाराने भरती प्रक्रीये दरम्यान राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

25) यापुढील सर्व माहीती जसे,पात्र/अपात्र उमेदवारांच्या यादया,प्रवेशपत्र, उत्तरसुची (AnswerKey),उमेदवारास प्राप्त गुण यादी,मुलाखतीस पात्र उमेदवाराची यादी,अंतिम निवड यादी ई. https://beedpp.recruitonline.in **<u>या संकेतस्थळावरील "पोलीस पाटील भरती प्रक्रीया 2026" या शिर्षकाखाली उपलब्ध राहील.</u>**

26) सदरील भरती प्रक्रीये बाबतीत सूचना, हरकत असल्यास भ्र.धो क्र. 9689911007 यावर सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 यो वेळेत संपर्क करावा.

27) वरील अटी, शर्ती नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी पदभरतीचे अनुषंगाने निर्गमीत केलेल्या सूचना,आदेश व निर्णय लागू राहतील.

दिनांक : 16 /01/2026
ठिकाण : परळी वै.

**(व्यंकटेश मुंडे)**
तहसीलदार परळी वै तथा
सचिव पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती - 2026

**(अरविंद लाटकर)**
उपविभागीय दंडाधिकारी, परळी वै. तथा,
अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती - 2026

प्रतिलीपी,

1. मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,बीड यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा.जिल्हा पोलीस अधिक्षक बीड यांना माहितीस्तव सविनय सादर.

3. उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई व माजलगाव यांना देवुन कळविण्यात येते की,सदर जाहिरात आपले कार्यालयाचे सुचना फलकावर दर्शनी भागात प्रसिध्द करावी.
4. तालुका दंडाधिकारी परळी वै. व गट विकास अधिकारी पंचायत समिती परळी वै. यांनी सदर जाहिरात आपले कार्यालयाचे सुचना फलकावर दर्शनी भागात प्रसिध्द करुन अहवाल सादर करणेची दक्षता घ्यावी. तसेच आपले अधिनिस्त ग्राम महसुल अधिकारी व ग्राम पंचायत अधिकारी यांना संबंधित गावात प्रसिध्द करुन प्रसिध्दीबाबतचा गाव निहाय मुळ पंचनाम्याच्या प्रतीसह आपला अहवाल विना विलंब या कार्यालयास सादर करावा.
5. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी,बीड यांना देऊन कळविण्यात येते की,सदर जाहीरात https://beed.gov.in या संकेतस्थळावर दि.19.01.2026 रोजी प्रसिध्द करावी.
6. M-Tech multi service यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.
7. पोलीस निरीक्षक परळी ग्रामीण, सहायक पोलीस निरीक्षक सिरसाळा व बर्दापुर यांनी सदर जाहिरात आपले कार्यालयाचे सुचना फलकावर दर्शनी भागात प्रसिध्द करुन अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.

**(व्यंकटेश मुंडे)**
तहसीलदार परळी वै तथा
सचिव पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती - 2026

**(अरविंद लाटकर)**
उपविभागीय दंडाधिकारी, परळी वै. तथा,
अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती - 2026

Officer Parli-V.

**उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,परळी वै. या उपविभाग अंतर्गत पोलीस पाटील पदाचे गावनिहाय आरक्षण**

**परिशिष्ट-अ**

| अ.क्र | तालुका | गावाचे नाव | सामाजिक आरक्षणाचा प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | परळी वै. | सबदाराबाद | अनुसूचित जाती (SC) | सर्वसाधारण |
| 2 | परळी वै. | टाकळी देशमुख | अनुसूचित जाती (SC) | सर्वसाधारण |
| 3 | परळी वै. | ब्रम्हवाडी | अनुसूचित जाती (SC) | सर्वसाधारण |
| 4 | परळी वै. | नाथरा | अनुसूचित जाती (SC) | सर्वसाधारण |
| 5 | परळी वै. | माळहिवरा | अनुसूचित जाती (SC) | सर्वसाधारण |
| 6 | परळी वै. | डिग्रस | अनुसूचित जाती (SC) | सर्वसाधारण |
| 7 | परळी वै. | कासारवाडी/ रामेवाडी | अनुसूचित जाती (SC) | सर्वसाधारण |
| 8 | परळी वै. | दौंडवाडी | अनुसूचित जाती (SC) | सर्वसाधारण |
| 9 | परळी वै. | कानडी | अनुसूचित जाती (SC) | महिला |
| 10 | परळी वै. | वाघाळा | अनुसूचित जाती (SC) | महिला |
| 11 | परळी वै. | मोहा | अनुसूचित जाती (SC) | महिला |
| 12 | परळी वै. | खामगाव | अनुसूचित जाती (SC) | महिला |
| 13 | परळी वै. | वानटाकळी | अनुसूचित जमाती (ST) | सर्वसाधारण |
| 14 | परळी वै. | .बोरखेड | अनुसूचित जमाती (ST) | सर्वसाधारण |
| 15 | परळी वै. | कन्हेरवाडी | अनुसूचित जमाती (ST) | सर्वसाधारण |
| 16 | परळी वै. | दाऊतपुर | अनुसूचित जमाती (ST) | सर्वसाधारण |
| 17 | परळी वै. | पिंपरी बु | अनुसूचित जमाती (ST) | सर्वसाधारण |
| 18 | परळी वै. | जळगव्हाण | अनुसूचित जमाती (ST) | महिला |
| 19 | परळी वै. | जयगाव | अनुसूचित जमाती (ST) | महिला |
| 20 | परळी वै. | पाडोळी | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | सर्वसाधारण |
| 21 | परळी वै. | मरळवाडी | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | महिला |
| 22 | परळी वै. | खारीतांडा | विमुक्त जाती (अ) VJ (A) | सर्वसाधारण |
| 23 | परळी वै. | श्रीकृष्णनगर | विमुक्त जाती (अ) VJ (A) | सर्वसाधारण |
| 24 | परळी वै. | डाबी तांडा | विमुक्त जाती (अ) VJ (A) | महिला |
| 25 | परळी वै. | तेलसमुख | भटक्या जमाती (ब) NT (B) | सर्वसाधारण |
| 26 | परळी वै. | वाघबेट | भटक्या जमाती (ब) NT (B) | सर्वसाधारण |
| 27 | परळी वै. | चांदापुर | भटक्या जमाती (ब) NT (B) | महिला |
| 28 | परळी वै. | हसनाबाद | भटक्या जमाती (क) NT (c) | सर्वसाधारण |
| 29 | परळी वै. | दगडवाडी | भटक्या जमाती (क) NT (c) | सर्वसाधारण |
| 30 | परळी वै. | गोपाळपुर | भटक्या जमाती (क) NT (c) | सर्वसाधारण |
| 31 | परळी वै. | गडदेवाडी | भटक्या जमाती (क) NT (c) | महिला |
| 32 | परळी वै. | भोजनकवाडी | भटक्या जमाती (ड) NT (D) | सर्वसाधारण |
| 33 | परळी वै. | लोणारवाडी | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 34 | परळी वै. | लोणी | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 35 | परळी वै. | परचुंडी | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 36 | परळी वै. | कौडगाव साबळा | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 37 | परळी वै. | हिवरा(गो) | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 38 | परळी वै. | आचार्य टाकळी | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 39 | परळी वै. | टोकवाडी | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 40 | परळी वै. | गोवर्धन (हि) | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 41 | परळी वै. | नागापुर | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 42 | परळी वै. | वैजवाडी | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 43 | परळी वै. | तपोवन | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 44 | परळी वै. | संगम | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 45 | परळी वै. | कौडगाव घोडा | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 46 | परळी वै. | मिरवट | इतर मागास प्रवर्ग (OBC) | सर्वसाधारण |
| 47 | परळी वै. | नागपिंपरी | इतर मागास प्रवर्ग (OBC) | महिला |
| 48 | परळी वै. | कौडगाव हुडा | इतर मागास प्रवर्ग (OBC) | महिला |
| 49 | परळी वै. | पिंपळगाव गाडे | इतर मागास प्रवर्ग (OBC) | महिला |
| 50 | परळी वै. | पोहनेर | इतर मागास प्रवर्ग (OBC) | महिला |
| 51 | परळी वै. | लाडझरी | इतर मागास प्रवर्ग (OBC) | महिला |
| 52 | परळी वै. | ममदापुर | इतर मागास प्रवर्ग (OBC) | महिला |
| 53 | परळी वै. | सरफराजपुर | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | सर्वसाधारण |
| 54 | परळी वै. | आनंदवाडी | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | सर्वसाधारण |
| 55 | परळी वै. | बोधेगाव | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | सर्वसाधारण |
| 56 | परळी वै. | करेवाडी | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | सर्वसाधारण |
| 57 | परळी वै. | कावळयाचीवाडी | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | सर्वसाधारण |
| 58 | परळी वै. | नंदागौळ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | सर्वसाधारण |
| 59 | परळी वै. | दौनापुर | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | सर्वसाधारण |
| 60 | परळी वै. | सेलु (प) | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | महिला |
| 61 | परळी वै. | भिलेगाव | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | महिला |
| 62 | परळी वै. | लिंबोटा | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | महिला |
| 63 | परळी वै. | गुट्टेवाडी | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | सर्वसाधारण |
| 64 | परळी वै. | सारडगाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | सर्वसाधारण |
| 65 | परळी वै. | नागदरा | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | सर्वसाधारण |
| 66 | परळी वै. | लेंडेवाडी | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | सर्वसाधारण |
| 67 | परळी वै. | वसंतनगर | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | सर्वसाधारण |
| 68 | परळी वै. | डाबी | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | सर्वसाधारण |
| 69 | परळी वै. | कौठळी तांडा | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | सर्वसाधारण |
| 70 | परळी वै. | बहादुरवाडी | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | सर्वसाधारण |
| 71 | परळी वै. | वानटाकळी तांडा | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | महिला |
| 72 | परळी वै. | मांडेखेल | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | महिला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 73 | परळी वै. | तळेगाव | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (**EWS**) | महिला |
| 74 | परळी वै. | वाका | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 75 | परळी वै. | कासारवाडी | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 76 | परळी वै. | हाळंब | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 77 | परळी वै. | कौठळी | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 78 | परळी वै. | जिरेवाडी | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 79 | परळी वै. | धर्मापुरी | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 80 | परळी वै. | हेळंब | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 81 | परळी वै. | खोडवा सावरगाव | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 82 | परळी वै. | दैठणाघाट | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 83 | परळी वै. | भोपला | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 84 | परळी वै. | सोनहिवरा | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 85 | परळी वै. | औरंगपुर | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 86 | परळी वै. | आस्वलांबा | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 87 | परळी वै. | वंजारवाडी | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 88 | परळी वै. | तडोळी | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 89 | परळी वै. | मैंदवाडी | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 90 | परळी वै. | इंदिरानगर | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 91 | परळी वै. | मलकापुर | अराखीव (**OPEN**) | सर्वसाधारण |
| 92 | परळी वै. | नंदनज | अराखीव (**OPEN**) | महिला |
| 93 | परळी वै. | श्रीरामनगर | अराखीव (**OPEN**) | महिला |
| 94 | परळी वै. | वडखेल | अराखीव (**OPEN**) | महिला |
| 95 | परळी वै. | मांडवा | अराखीव (**OPEN**) | महिला |
| 96 | परळी वै. | इंदपवाडी | अराखीव (**OPEN**) | महिला |
| 97 | परळी वै. | मलनाथपुर | अराखीव (**OPEN**) | महिला |
| 98 | परळी वै. | धारावती तांडा | अराखीव (**OPEN**) | महिला |
| 99 | परळी वै. | बेलंबा | अराखीव (**OPEN**) | महिला |

**(व्यंकटेश मुंडे)**
तहसीलदार परळी वै तथा
सचिव पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती - 2026

**(अरविंद लाटकर)**
उपविभागीय दंडाधिकारी, परळी वै. तथा,
अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती - 2026

## नमुना-फ
## स्वयंघोषणापत्र

मी,श्रीमती(लग्नानंतरचेनाव)------------------------------------------------------ राहणार

(गावाचे नाव)-------------------------ता.-----------------------जि .बीड येथील रहिवासी आहे.याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

1. मी पोलीस पाटील पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
2. माझे लग्नापूर्वीचे नाव श्रीमती-----------------------------------------------असे आहे व लग्नानंतरचे नाव श्रीमती-------------------------------------------असे आहे.
3. पोलीस पाटील पदाच्या फॉर्मचा आयडी क्रमांक-------------------------------------
4. आधार क्रमांक--------------------------------------------------------------------

वरील दोन्ही नावाची व्यक्ती मीच असून यात काही तफावत आढळल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार मी राहील व यामुळे पोलीस पाटील पदासाठी मी अपात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण-

दिनांक-

संपूर्ण नाव---------------------------------------------------- सही-

**सुचना-**

1. सर्व विवाहीत महिलांनी पोलीस पाटील पदासाठी लग्नापुर्वी/लग्नानंतरचे नावाने केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील.
2. उमेदवाराने लेखी परिक्षाच्या वेळेस रंगीत प्रवेशपत्र (Color Copy) व आधारकार्ड सोबत सदरचे स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय परळी वै.**

**( दंड विभाग )**

दुरध्वनी/फॅक्स:-02446-226330 Email-Id:-sdoparli@gmail.com

**जाहीरनामा**

**उपविभागीय दंडाधिकारी परळी वै. यांचे कार्यालय, जिल्हा बीड**

**पोलिस पाटील पदभरतीसाठी जाहिरात 2026**

**जाहिरात क्र. 01/2026**

बीड जिल्हयातील परळी वै. उपविभागातील उपविभागीय दंडाधिकारी, परळी वै. कार्यालयांतर्गत गाव पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवाराकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच **https://beed.gov.in व https://beedpp.recruitonline.in** या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**परळी वै.** उपविभागातील पोलीस पाटील संवर्गातील एकूण रिक्त पदे- 09

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरवात | दिनांक 19.01.2026 वेळ 00.00 वा. पासून |
| ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | दिनांक 30.01.2026 सायं 23.59 पर्यंत |
| परीक्षा शुल्क | खुला प्रवर्ग-1000/- रु<br>मागासवर्गासाठी-800 रु |
| लेखी परीक्षा | 22/02/2026 |

पोलीस पाटील भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहीरात पध्दतीनेच **https://beed.gov.in व https://beedpp.recruitonline.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहीती काळजी पूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज विहित चलनाव्दारे भरलेले प्रक्रिया शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगीत करणे किंवा रद्द करणे, अशंत: बदल करणे, पदांच्या एकूण वर्गवारी निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट, आरक्षणात बदल करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात प्राप्त तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, परळी वै. यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

दिनांक : 16.01.2026
ठिकाण : परळी वै.

**(व्यंकटेश मुंडे)**
तहसीलदार परळी वै तथा
सचिव पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती - 2026

**(अरविंद लाटकर)**
उपविभागीय दंडाधिकारी, परळी वै. तथा,
अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती - 2026